## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : ८७५/२०२२**

तक्रारकर्ता, श्री.कैलास तुकाराम जाधव
रुम नं.१५, ३ रा माळा, बिल्डींग नं.२
भागिरथी विहार, स्वामी समर्थ मठाजवळ, आपटे वाडी
शिरगाव, बदलापूर पूर्व, जि.ठाणे ४२१ ५०३

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक
उरण नगरपरिषद, उरण
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक
उरण नगरपरिषद, उरण
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २१/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २१/२/२०२२ | ४/३/२०२२ | ३०/३/२०२२ | २०/५/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.२४/८/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.बिपीन ज्ञानदेव निकम, रचना सहायक, उरण नगरपरिषद उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" उरण नगरपरिषद हद्दीतील ज्या इमारती धोकादायक म्हणुन घोषीत केल्या आहेत. आपल्या संबंधित विभाग यांच्याकडून खातरजमा झाल्याचा लेखी अहवाल, प्रस्ताव व त्याबद्दलची संपूर्ण माहिती"*

तद्‌नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.२०/५/२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग उरण नगरपरिषद यांनी अपिलार्थी यांना पाहण्याची व तपासण्यासाठी पुन्हा संधी उपलब्ध करुन दयावी तसेच उपलब्ध माहिती त्यांना मोफत पुरविण्यात यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारदार यांनी निवेदन केले की, सदरची माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना माहितीचे निरीक्षण देऊन दि.२३/३/२०२२ रोजी माहिती दिलेली आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ मे, २०२५ .

Comp-३